# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bideo Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र.७५० दिनांक २१/१०/२०२०

# शूर आम्ही वंदिले...

## पालघर पोलीस दलाकडुन पोलीस हुतात्मा स्मृती दिनानिमित्त शहीद जवानांना श्रध्दाजंली

दिनांक २० ऑक्टोंबर १९५९ या दिवशी लेह लडाख मधील भारताच्या सिमेवर बर्फाच्छादीत व निर्जन अशा हॉट स्प्रिंग या ठिकाणी गस्ती करिता गेलेले दोन कर्मचारी परतले नाहीत म्हणुन दिनांक २१ ऑक्टोबर १९५९ रोजी त्यांच्या शोधाकरिता इंडो-तिबेट बॉर्डर पोलीसांचे डी.वाय.एस.पी करणसिंग यांच्या अधिपत्याखाली CRPF आणि I.T.B.P. चे दोन अधिकारी व २० कर्मचारी पाठविण्यात आले. त्याच्यांवर दबा धरुन बसलेल्या चिनी सैनिकांनी अचानक केलेल्या हल्याला कडवे आवाहन देत त्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत झुंज दिली. त्यात १० जवान वीरगतीला प्राप्त झाले. त्याच्या स्मृतीप्रित्यार्थ देशभरातील सर्व पोलीस दलातर्फे दरवर्षी २१ ऑक्टोबर हा दिवस पोलीस हुतात्मा दिवस म्हणुन पाळला जातो. हे शौर्य इतिहासात गौरवशाली स्मृतीचिन्ह बनले.

या वीर जवानांनी दाखविलेल्या अतुलनीय शौर्यापासुन इतरांना स्फुर्ती मिळावी तसेच आपल्या कर्तव्याची व राष्ट्र निष्ठेची, जाणीव व्हावी म्हणुन शहीद जवानांच्या स्मृतीप्रित्यर्थ दिनांक २१ ऑक्टोंबर हा दिवस संपुर्ण भारतभर पोलीस हुतात्मा दिन या नावाने पाळला जातो.

सदर हुतात्मा दिनी मा.डॉ.माणिक गुरसळ, जिल्हाधिकारी पालघर, मा.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक, पालघर मा. प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांनी हुतात्मा स्मृती स्तंभास पुष्पचक्र अर्पण करुन श्रध्दाजंली वाहीली. दिनांक ०१ सप्टेंबर २०१९ ते ३१ ऑगस्ट २०२० या कालावधीत कर्तव्य बजावीत असताना धारातीर्थी पडलेल्या देशभरातील २६१ पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या नावांचे मा.विकास नाईक, उपविभागीय पोलीस अधिकारी, पालघर व मा.शैलेश काळे, पोलीस उपअधीक्षक गृह यांनी वाचन करुन पालघर पोलीस दलाकडुन रायफलच्या तीन वेळा फैरी झाडुन शहीद जवानांना मानवंदना देण्यात आली.

Scanned with CamScanner